# परिशिष्ट्ये

# परिशिष्ट अ

## लोणंद परिसरातील संकलीत धनगरी लोकगीते

1\. भंडारा खोबरे घेऊ द्या फिर
मला बी जेजूरी येवू द्या ।।धृ।।
खूप आयुश गेल सार
नाही पाहिल जेजूर
धनी मार्तंड मल्हार
नाही पाहिला आजवर
बकरी राखायच काम आज राहू द्या
मला जत्रेला येवू द्या । भंडार खोबर घेऊ द्या ।।1।।
नऊ लाख पायऱ्या वर
आठरा कमाणी त्या सुंदर
साडे तिनशे नक्की दार
दिपमाळा शोभे घरोघर
डोळे भरून आज पाहू द्या । मला बी जत्रेला येऊ द्या ।।2।।
न्हाऊ घालुन शिवमल्हार
वाहिला बेल भंडार
तळी भरून या सत्वर
खोबरे उधळून कासवावर
देवाचे सारे होवू द्या । मला बी जत्रेला येवू द्या
भंडार खोबरे घेऊ द्या । मला बी जत्रेला येवू द्या ।।3।।

गायक – विठ्ठल राघू पडळकर
वय – 35, व्यवसाय – मेंढपाळ
गाव – पाडळी, ता.खंडाळा, जि.सातारा

2. पोवाडा

धन्य धन्य बाटली ग बाई । तोटयाची ग आई ।

खरी देशद्रोही । सर्व जगती रे हिचा झगडा ।

थोरांना दिला कणी कोंडा । जीर जी जी जी ।।1।।

ऐका ऐका हिचे पराक्रम

हाती लागुनी हिच्यामुळे शकदिन झाला

विद्येचा नायनाट केला ।

संजीवनी करी दूर त्याला । जीर जी जी ।।2।।

घरी नाही खान्या भाकर ।

तरी हा वीर जाय ।

बरोबर बाटली घेऊन दुकानाला ।

रस्त्यामधी गुंगी येई त्याला ।

गाढवे – डुकरे ह्याच्या संगतीला । जीर जी जी जी ।।3।।

घेऊनी तुळजापुरी गेले ।

हालहाल केले ।

डोळे काढीले ।

असा वध संभाजीचा केला ।

दारूचे व्यसन जडले त्याला ।

मराठय़ांचा हिरा स्वर्गी गेला ।

वंशनाथ राजा पकडीला । जीर जी जी जी ।।4।।

पोवाडा इथे संपला ।

आज गाईला चरणी वाहीला ।

शांतपणे ऐकविले कवना ।

नामदेव धायगुडे गाई पोवाडयाला । जीर जी जी जी ।।5।।

गायक – श्री. नामदेव विष्णू धायगुडे

वय – 55, व्यवसाय – मेंढपाळ

गाव – निंबोडी, ता. खंडाळा, जि. सातारा.

3.

खांद्या घोंगडी हातात काठी रानात मेंढर वळ,

ताक कन्याचो खावून न्याहारी तुकडे खाई शिळ

खंडेरायाला म्हणाला चल रानावनात पळ ।।1।।

जेजुरी नगरीत देव नांदती आनंदान

विडा पैजेचा खेळविती तुम्ही देव लोकानं,

नारदाने लावली कळ रानावनात पळ ।।2।।

नऊ लाख मेंढर चारण्या देव राहिला गडी,

पाणी पाजण्या देव जातो निरा नदीच्या थडी

दैवाचा कसा हा खेळ रानावनात पळ ।।3।।

खंडोबाने आणली बानू ती जेजूरी

ती येवून राहिली अर्ध्या गडावरी

वाहे सतिश चरणी फुल रानावनात पळ ।।4।।

नाव :- सतिश नाना कारंडे

वय - 35, व्यवसाय - मेंढपाळ

गाव - निंबोडी, ता. खंडाळा, जि. सातारा.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

4. "सुंबरान मांडील"

सुंबरान मांडील । मांडल्या या येळला ।
आदी नमो गणपते । मग सरस्वती मातेला ।
करत्या माझ्या नंदीला । करत्या माझ्या बैलाला ।
कैलासाच्या संबाला । संभावतार लिंगाला ।
गुरू केदार लिंगाला । गुरू काशी लिंगाला ।
तेतीस कोटी देवाला । चंद्रसूर्य त्या भावाला ।
म्हसूबा देवाला । पारशेर ऋषीला ।
देवा माझ्या इटटला । नमन तुमच्या गादीला।
याव आमच्या शब्दाला । नमन तुमच्या गादीला ।
सुंबरान मांडील आता । मांडील ।
सुंबरान मांडील । गुरूमारग दावायला ।
दुपार या योगाला । दिल्ली हस्तीनापुराला ।
सोन्यायाच्या द्वारकेला ।श्रीकृष्ण देवकीला ।
बळीराम दादाला । पाठच्या भावाला ।
सुभीदरा भैनीला । द्रिंडीच्या वाडयाला ।
अर्जुनाच्या बाळाला । येक बहीण पाठीला ।
सुभीद्राला दिली होती । बारा वर्षे झाली होती ।
दोघेजण भाऊ गा । सोन्याच्या द्वारकेला ।
एकमेका बोलत । एकमेका सांगत ।
दिवाळीचा सण आला । चला भाऊ बिजेला ।।
चौदा घोडयाचा वो । रथ तयार केला ।
शेजेच्या पांगेतला । वारू शेलका घेतला ।

दोपारचा दिवस । मावळाय लागला ।

सुंबरान मांडील । आता मांडील ।

भोळया माझ्या । देवाच ।

नाव – श्री. आप्पा नागु धायगुडे

वय – 35, व्यवसाय – मेंढपाळ

मु. पो. सुखेड, ता. खंडाळा जि. सातारा.

5. बाबू गेनूचा पोवाडा

देशासाठी जागृत झाला । वीर बाबू गेणू मेला ।
शूर मर्दानी अर्पिला जीव । प्राण प्राण प्राण ।।धृ।।
कापड विक्रीच्या टायंबाला । बाबू गेनू पुढे सरसावला ।
मोटार लॉरी आली रस्त्याला । बाबू गेनू आडवा पडला ।
गोरा साहेब चकीत झाला । म्हणे छान छान छान ।।1।।
मोटारीतून खाली उतरीला । हट जाव बोले बाबूला ।
शूर मर्द बोले रागात । रक्ताचा सडा शिंपीन ।
गाडीची राख करीन । धर ध्यान ध्यान ध्यान ।।2।।
गोरा साहेब लालीलाल झाला । गाडी चलाव बोले ड्रायव्हरला ।
तो ड्रायव्हर मनी शरमीला । कसा घेऊ भावाचा प्राण ।
झाड गोळी तपल्या हातात । भारताशी नाही बैमान ।
हीच आन आन आन ।।3।।
गोरा साहेब लालीलाल झाला । बैसला गाडी हाकण्याला ।
दोनी चाके भिडली अंगाला । बाबू गेनूचा चुराडा झाला ।
गेला प्राण प्राण प्राण ।।4।।
हाडामासाचा काला झाला । रक्ताचा पाट वाहीला ।
भारत मातेच्या मांडीला । बाळ बाबू गेनू झोपला ।
चाळीस कोटी जीव तळमळला । है रान रान रान ।।5।।
कोंडाबाईच्या पोटी जन्मुन । बाळ बाबू गेनू झाला पावन ।
पुष्प हार येती लाखान । मन ध्यान करती वंदन ।
रत्न खान खान खान ।।6।।

भारताच बाळ लाडक । दिली साम्राज्याला धडक ।
देशाचा हिरा अर्पीला । नामदेव शाहीर बोले वीराला ।
गाजवा हिंदू शौर्याला । मिळवा मान मान मान ।।7।।

शाहीर – नामदेव विष्णू धायगुडे
वय – 55, व्यवसाय – मेंढपाळ
मु.पो.निंबोडी, ता.खंडाळा, जि.सातारा.

6. वाग्देव

तूचि कैलास पती उमा रमण ।
अवतरसी, स्वच्छ करून ।
पावण केले दोषी जन ।
कृपाप्रसाद करूनी ।।1।।
भक्ते त्यजावा अहंकार ।
म्हणून तू झालास धनगर ।
"करे" कुळी घेसी अवतार ।
करी सर्वांना चकीत भार ।।2।।
बालपणी हिवरे गावी ।
खेळलासी चक्रपाणी ।
केली गो म्हैसींची राखणी ।
केली तू देवाधिदेवा ।।3।।
तसेच कर वाग्देवराया ।
निरसी आमची मोहमाया ।
असू दे तव कृपेची छाया ।
हिच विनवणी दासाची ।।4।।
झेंडा घेऊनी खांद्यावरी ।
घंटा धरूनी स्वकरी ।
तू नाचलास परोपरी ।
विठ्ठल रूखमाई या छंदे ।।5।।

नांव – शिवाजी दाजी कोळपे

वय – 45, व्यवसाय – मेंढपाळ

मु.पो.सालपे, ता.फलटण, जि.सातारा.

1. **स्त्रीगीते**

तिळ तांदळ भरल ताट

तिळ तांदळ भरल ताट ।।धृ।।

वर ठेवली पाच आवळ

का ग रडत वेड मावळ

आसू ज्याची व्हती त्यानी नेली

वेडी मायाच वाया गेली ।।1।।

तिळ तांदळ भरल ताट

वर ठेविल पाची गव्हू

गणागोताला येत रडू

आसू ज्याची व्हती त्यानी नेली

वेडी मायाच वाया गेली ।।2।।

तिळ तांदळ भरल ताट

वर ठेविल पाची गव्हू

का ग रडत येड भाऊ

आसू ज्याची व्हती त्यानी नेली

वेडी मायाच वाया गेली ।।3।।

तिळ तांदळ भरल ताट

वर ठेविल्या पाची फण्या

का ग रडता येडया भन्या

आसू ज्याची व्हती त्यानी नेली

वेडी मायाच वाया गेली ।।4।।

तिळ तांदळ भरल ताट

वर ठेविली एक भाजी

का ग रडती येडया आजी

आसू ज्याची व्हती त्यानी नेली

वेडी मायाच वाया गेली ।।5।।

तिळ तांदळ भरल ताट

वर ठेविला एक चाफा

नको रडूस वेडया बापा

दारी व्हती बोरी बाय

त्याज्याव बसला जावाय चोर

इंदा गेलीय त्याज्या बर ।।6।।

नाव – सौ.भामाबाई राघू खरात

वय – 48, व्यवसाय – मेंढपाळ

मु.पो.निंबोडी, ता.खंडाळा, जि.सातारा.

2. कडजाई देवी :–

कडजाईला जाण्या वाट लागे डोंगराची
हळूहळू हाका धनी गाडी घुंगराची ।।धृ।।
रहाणी आपली मराठमोळी
नऊवारी ल्याले लुगडे चोळी
पायी तोडे फूल मासोळी
सजले राया मी साधी भोळी
आस नाही केली मी सोळा शिणगाराची ।
हळू हळू हाका धनी गाडी घुंगराची ।।1।।
जंगल झाली आहे ती दाट
दगड धोंडयाची पाऊलवाट
हाती धरावा कासरा घट्ट
उतरावा लागेल अवघड घाट
घाटावरून पाहता नक्षी दिसे घरांची ।
हळूहळू हाका धनी गाडी घुंगराची ।।2।।
पौर्णिमेला गर्दी भारी
कडजाईच्या दरबारी
चोळी पातळ नैवेद्य देऊन
आली सगुणा शुक्रवारी
सांगितली कथा तिने आईच्या डोंगराची
हळू हळू हाका धनी गाडी घुंगराची ।।3।।

नावं – कोंडाबाई मल्हारी कोळेकर

वय – 60, व्यवसाय – मेंढपाळ

गाव – निंबोडी., ता.खंडाळा, जि.सातारा.

3. **चिलयाबाळाचे गाणे** :-

"चिल्या बाळाची वाटून केली खीर
देव बसले भोजनी चांगुणाच मन धीर
चिल्या बाळाची वाटून केली भाजी
देव बसले भोजनी मन चांगुणाच राजी
चिल्या बाळचा कांडून . केला भात
देव बसले भोजनी चांगुणास झाली रात
चिल्या बाळाचा कांडून केला वडा
देव बसले भोजना चांगुणाच मन सोडा
चिल्या बाळाचा कांडुनि केला भुसा
देव बसले भोजनी चांगुणाले बाय पुसा
चिल्याबाळाची चांगोनी माता खरी
बोलेले ऋषीमुनी काय मागसी मागवरी
पारबत्ती बाईचा महादेव भरतार.
चांगुणाबाईचा त्याने केला उध्दार ।।

नाव - ताईबाई नाना कारंडे

वय - 60, व्यवसाय - मेंढपाळ

गाव - निंबोडी, ता.खंडाळा. जि.सातारा.

4.

"देवा खंडेराया बानू घातली खिशात
दोन बायकांची चाल पाडली देशात
म्हाळसा वाण्याची बानाई धनगराची
चढू दिली नाही तिला पायरी गडाची
धनगर वाडयात कुत्रे भुकती
नेली बानुबाई येडे धनगर लडती
बानाई धनगरणी तुझ्या ताकामंधी माशा
जेजूरीच्या खंडेराया लागली तुही आशा
पाण्यातला माझा ह्याला मधोमधी काटा
एका पलंगावरी दोन्ही सवतीचा वाटा."

नांव – सौ.कमल बाळू पडळकर
वय – 40, व्यवसाय – मेंढपाळ
गाव – पाडळी, ता.खंडाळा, जि.सातारा.

5. लाडके ग लेकीबाई
लाड खाण्याचा पिण्याचा
उचलला ग वाटा तू
परघराला जायाचा ।।1।।
लाडके ग नंदाबाई
बापासंग जेवू नको
जाशील ग परघरा
लई माया लावू नको ।।2।।
लाडक्या ग लेकीच
तोंड पोळल भाजीन
दह्या ग दुधाची
सव लावली आजीन ।।3।।
बाप म्हणे लेकी
देवूनशीन आलो
तुझ्या ग नशीबाला
जामीन नाही झालो ।।4।।
लाडकी ग लेक
मला पुण्यात द्यायाची
जावई घोडयावर
मैना बग्गीत यायाची ।।5।।
बापान दिली लेक
वाटवरच्या गोसाव्याला
नशीब ग हिच थोर
पालखी ग बसायला।।6।।

नाव – सौ.सुनिता उत्तम माने
वय – 20, व्यवसाय – मेंढपाळ
गाव – पाडळी, ता.खंडाळा,
जि.सातारा.

6. बाई दळण दळते । दळते मी पाच दाणे
झोपले पाळण्यात । सोनुले बाळ ताने
दळण दळताना । हाताला आले फोड
रथ संसाराचा बाई । गेला कसा भारी जड ।।1।।
सुपातले ओले गव्हू । दळते मी कारणाला
कृष्णाचा जन्म झाला । गोकुळ अष्टमीला
जाते मी ओढते बाई । अंग ओढता डोलते
मनगटी माऊलीचे । दूध सारखे खेळते ।।2।।
तुझ्या अंगातली चोळी । झाली आंगी माझ्या तंग
माऊली मी ग । तुही गोड चवळीची शेंग
तुझ्या अंगातली चोळी । माझ्या अंगाला येईना
झाली माया बाई तुझ्या । बरोबरीची मी मैना ।।3।।
दळण हे दळताना । अंगाच्या झाल्या गंगा
माय ग माऊलीन । मला चारल्या लवंगा
बाई दळण सरल । मिळाल फळ
सर्व्या घरात बघा । माणसाल आल बळ ।।4।।

नांव – लिलाबाई मारूती शेळके

वय – 50, व्यवसाय – मेंढपाळ

गाव – लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा.

7.

"दिवाळी दसरा लेकी बाळीचा सण
नाही पाठविली कोण्या अभाग्यान सून
दिवाळी दसरा कधी येईन बिचारा
भावाला ओवाळायला सण नाही दुसरा
किती वाट पाहू दिवाळी बाईची
लागली आशा मला भाऊच्या चोळीची
किती वाट पाहू भाऊच्या गाडीची
सावली कलली माझ्या उपरमाडीची
वाट पाहून पाहून डोळे झाले कुकावानी
एवढी तुझी माया का झाला लोकावानी."

नाव – सौ.बायडाबाई संदीप पिसाळ

वय – 35, व्यवसाय – मेंढपाळ

गाव – बोरी, ता.खंडाळा, जि.सातारा.

8. तळूनमळून केला पोळा
पंचमीन उघडला डोळा
पंचमीची काढते चित्र
आली वडीलांची पित्र ।।1।।
पितराची शिजते डाळ
आली घटाची माळ
घटाच्या माळला बांधते गाठी
शिलांगणाला झाली दाटी ।।2।।
शिलांगणाच घेंते सोनं
दिवाळीन केल येनं
दिवाळीची पाजळते पणती
संक्रात आली नेणती ।।3।।
संकांतीच पुजते सुगड
माही पुनव आली दुगड
माही पुनवेची लिंबते कणीक
शिवरात्र आली आणिक ।।4।।
शिवरात्रीच सोडते पारण
शिमग्यान घेतले धरण
शिमग्याची करते खीर
पंचमीन टाकला धीर ।।5।।

पंचमीचा शिंपते रंग

पाडवा आला जबर दंग

पाडव्याची उभारते गुडी

आखिती आली लाडी

आखितीचा पुजते कन्हा

आषाढी पातूर दम धरा " ।।6।।

नाव :– सौ. रंजना शिवाजी खताळ

वय – 45, व्यवसाय – मेंढपाळ

गाव – मरीआईचीवाडी ता. खंडाळा, जि. सातारा.

9. "सकाळी उठुनि मला कसा लाभ झाला
तुळशीच्या वटयावरी करंड कुंकाचा सापडला
सकाळ उठुनि तुळशी टाकती सडा
पाप – पुण्याचा निवाडा
सकाळी उठुनि तुळशी लावती गंध
देवा पुरव माझा छंद
सकाळ उठुनि दारी तुळस दैवरली
पतिव्रता मी सेवा केली
विठ्ठल बोलतोकिती रूक्मिण हसू याली
तुझ्या या पदरानी तिची मंजुळ तुटयाली
रूक्मिण बोल का ग तुळस वाटला
तुझ्या या मंजुळात माझा पदर फाटला
तुळशी बाईला गार पाण्याचा गारवा
सत्यभामाला दोरवा
पंढरपुरामधी तिथ राह्याला नाही जागा
पांडु या रंगान लाविल्या तुळशीबागा
पंढरपुरामधील तुळशी आल्यात हुरडयाला
सावळा पांडुरंग विणा वाजवी बुरडाला."

नाव – सौ. लक्ष्मी बाळू धायगुडे
वय – 40, व्यवसाय – मेंढपाळ
गाव – सुखेड, ता. खंडाळा. जि. सातारा

10. बिरदेवाच्या गच्चीवरी डफाढोलाची एक घाई
देवा या बिराजीला चढ पोशाख शिंदेशाही ।
सकाळच्या पारी पिवळया झाली गली
देवा या बिराजीला चढ पोशाख मलमली।।1।।
बिरदेवाच्या गच्चीवर गजी नाचून आला घाया
लावा भंडार पडा पाया ।
बिरदेवाच्या गच्चीवरी गजी आल्याती काकुळती
ढोल्या करावी दुपारती ।।2।।
बिरदेवाच्या गच्चीवरी गज्यागज्याचा पड भांग
माझ्या या बाळाची कवळी कंबार लव आंग ।
बिरदेवाच्या नाव टाका टिपर झाडुनि
देव ये बिराजी आला पाषाण सोडुनि ।।3।।
देवा या बिराजीचा आला छबिना डौलदार
संग कोळपा शिलेदार ।
पालखीच गोड वाऱ्यानी गेला आत
देवा बिराजीचा नाच छबिना साऱ्या रात ।।4।।
जिवाला माझ्या जड नको वैद्याची भालदोरी
देवा या बिराजीच्या आणा न्हाणीचं तिर्थवरी।
जिवाला माझ्या जड डोक दुखत राहवनी
देवा या बिराजीला आणा वैद्याला जाउनी ।।5।।
जिवाला माझ्या जड डोक दुखतं केसामधी
देव ये बिराजी वैद बंगाल्या देशामधी ।
जिवाला माझ्या जड डोक दुखत भांगापट्टी
देवा या बिराजीला माझ्या वैद्याला धाडा चिठ्ठी ।।6।।

जिवाला माझ्या जड पटट दुखत पाटीच
देवा या बिराजीच आल कारण दाटीच ।
बिरदेवाला जाया माझ्या वटीला गोंड चाळ
.तान्ह या माझ राघू पुढ गेल्याती गजी बाळ ।।7।।
गावामधी गाव गाव सालप खडकावरी
देवा या बिराजीचा वाडा सातारा सडकवरी
कामीन धुण धुती बिरदेवाच सवळ.
सर्द्या चालली पिवळ ।।8।।
सर्द्या बाईला आला पुर दगड बुडाली लहानथोर
बिरदेवाची कामीन शेला धुतीय पायावर ।
बिरदेवाच्या पाठीमाग हायती कडयाव पाच पीर
त्याच्या या पाठीमाग सर्द्याबाई चाल थीर ।।9।।
देवाच्या देवळात उभी राहते मी गाभाऱ्यात
देवा या बिराजीन मोती दिल्यात अंगाऱ्यात ।
देवाच्या देवळात मला उशीर लोटला
देव य बिराजी राजा मला भेटला ।।10।।
देवाच्या देवळात उभी राहिली एका कोणी
देव ये बिराजी नेत्र उघड राजा दोनी ।
सरील दळण सरती आरती कुणी केली
बिरदेवाची कामीन दळू लागून मला गेली ।।11।।
सरील दळान सरता अभंग मला येतो
रामाच्या रथावरी कुचा मोराचा ढाळ देतो।
सरील दळान मला आणिक घेण झाल
माझीया बंधुनी बाप लोकांनी येन केल ।।12।।

सरील दळान दोनी टाग्रंबाची निचिती

जात्याच्या पाळीला कृष्णा देवाची वसती ।

सरील दळान नको निखळू डाव्या हाती

धर्म केलाला वाया जाती ।।13।।

नाव :– कोंडाबाई मल्हारी कोळेकर

वय – 60, व्यवसाय – मेंढपाळ

गाव – निंबोडी, ता. खंडाळा, जि. सातारा.

# "परिशिष्ट" – ब

## धनगरांची कुळी, आडनावे, गोत्र यांचा तक्ता

| अ.नं. | मुख्य कुळी | आडनावे व उपनावे | कुळ गोत्र | वंश | ऋषी गोत्र | प्रवर |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | खरात | धायगुडे, पांढरे, सूळ, बोखार अमाने, ढाके, पालवे, टेळे, कोळपे, घागरे, पिंजारे, रायजादे, कावळे, भडके, घोडके, वेळे, तरडे, ढवळे, तामखई, रत्नपारखे, मळगे, झुरळे, वांदे, गेटे, व्हरकाटे, लांडगे, तोंडगे, पटकारे, भोपाळे, थोरबाले, सुरसुळे, पुणेकर, गुलदवडे, खराटे, सातकुळे, वनबे, पळसगावडे, चुतकले, गोलारी | परिहार | अग्नी वंश | पुंडरीक | — |
| 2. | लवटे | नरूटे, बंडगर, माने, मरगळे, हजारे, शेंडगे, बावरे, डबळे, पोकळे, क्षीरसागर, चौरे, हलगे, करगळ, किसवे, गावडे, थिटे, ब्रिंदुगडे, वरकडे, गास्के, रोडे, मारगुडे, झिवड, रेवे, अडरे, बड्डरे, दरगुडे, बागनवर, झाडगर, बरले, निगुंडे, बंधनवर, मिसाळ, बिरजे, तांदळे | सोळंकी | अग्नी वंश | भारद्वाज | अंगीरस बार्हस्पत्य भारद्वाज गरवाट पिसाळ, कागुगडे नेमाणे, धुलगुडे भानवसे रोमडे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 3. | थोरात | अनावसे, महानवर, तान्हाळ, खटक, वायकुळे, पावणे, सातपुते, लोखंडे, शिंगटे, देवकर, कालगुडे, बकर, बरवे, खमंगळ, सुपकर, सुपणे, लटे, पांढरभिसे, सुभने, पाटोळे. | गह लोळ | सूर्य वंश | कश्यप | कश्यप, वत्स्य नैध्रुव |
| 4. | कोळेकर | मुरडे, सोसे, दाइंगडे, करपे, हममखोरे, बोटयारे, दीडवाग, आगलावे, बनसोडे, चवधारे, आनावळे, नासके, गाडवे, राऊत, कुंडलीक, भागवत रामाचा मुलगा कुश याचा वंश. | कछवाह | सूर्यवेश | मानव | चावन आत्पवन जमदग्नी |
| 5. | शिंदे | झुंजे, काळजाते, कांडुरे, हांडवरे, खडके, बेंदरे, ढोणे, बिचकुले, हराळे, सुटे | परिहार | अग्नी वंश | पुंडरीक | -- |
| 6. | हाके | मदने, खरेजे, गोपणे, दहिभासे, घटकडे, हांडे, दोलवडे, लुबाळे, इंवडे, झालकर, मेटकरी, पिसे, बिजुगडे, हिसे, लांडे, बने बरगाळे, वरणे. | यादव | चंद्र वंश | कौंडिण्य | कौंडिण्य अंगीरस बाईस्पत्य |
| 7. | स्वार | सुडनवर, हेगडकर, बलार, बरंगे, हापटवर, गेळे, दिडे, शिरगिरे, गोयकर, साठे | गहलोल | सूर्यवंश | कश्यप | कश्यप, वत्स नैध्रूव |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 8. | सोलनकर | हिरवे, इक्कर, ढवरे, ओंगरे, निटवे, इंगळे, डोईफोडे, तांबे, (बोकड न खाणारे), सीद, पाडुळे, घगरे, गवंड, घोगरे, धुपे, सरजे, गाडेकर, कोळसे, होड, ढमढेरे, वीरकर | यादव | चंद्र वंश | कौंडिण्य | अंगीरस कौंडिण्य बाईस्पत्य |
| 9. | देवकळते | अर्जने, गोरड, व्हनमाने, वलेकर, रूपनवर, बरकडे, मेटकरी, ढेरे, तांबे (बोकड खाणारे), तळे डोंगरे, बगडे, भामटे, उतरे, कोले, झाडे, खिलारी, दांबे, अगुणे, दोरवे हनुमाने, सुडक, निगडे | चौहान | अग्नी वंश | वत्स | भार्गव, आप्तवन, आर्य च्यवन जामदग्न्य |
| 10. | बाकसे | उसके, मसके, चोरमले, शिरसट, बंगले, कुन्हाडे, मुगुटराव | ग्रहगोल | सूर्यवंश | कश्यप | कायश्व वत्स, नैध्रूव |
| 11. | सरगर | सोडनकर, कोंडे, पिपरे, कटरे, मलगौंडे, गडवे, मेटकरी, कुसपे, नांबळकर, सुंसपे, खुपकर, पिंजारी, तुरबारे | चौहान | अग्नीवंश | वत्स | भार्गव, च्यवन आप्तवन, आर्य, जागदग्न्य |
| 12 | सरक | झरक, तारनवर, शेळके, जिटे, लकडे, चोपडे, भडके, पेरवले, हराळे - बिरजे, पिसाळ, शेलार | सोळंकी | अग्नीवंश | भारद्वाज | अंगीरस बार्हस्पत्य भारद्वाज |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 13. | हालनवर | बीवकर, दिलगुडे, हुलगुंडे, दुधे, सरवदे, येळे, सिध्दगुरू, कोडलकर | गहलोल | सूर्यवंश | कश्यप | काश्यप, वत्स, नैध्रूव |
| 14. | कोकरे | हाजगे, होगले, अस्वले, पिंगळे, सोनटक्के, कन्हाडे, माळवदे, रायकर, वीरकर, लांभाटे, हुलकर | रांठोड | सूर्यवंश | गौतम | अंगीरस आयास गौतम |
| 15. | जानकर | कारंडे, राऊत, मोटे, माळे, धुले, बिडघर, वाघे, करमारे, पुडळकर | गहलोल | सूर्यवंश | कश्यप | काश्यप, वत्स नैध्रूव |
| 16. | काळे | महिन, गहीन, सारसे, हुबाले, श्रीराम, गोरे, डोंबाळे, सिनगारे, घरकडवे, दंडस, नामकडे, सिगिरे. | कदम | सूर्यवंश | मानव | च्यवन आप्तवन जामदग्न्य |
| 17. | खताळ | शेजाळ, दुधाळ, वाघमारे, गरंडे, गलंडे | सोळंकी | अग्नीवंश | भारद्वाज . | अंगीरस बार्हस्पत्य भारद्वाज |
| 18. | येडगे | जेडगे, सत्रे, जुगदार, जोंधळे जवळ, गरंडे, गलंडे, रेडके. | गहलोक | सूर्यवंश | कश्यप | काश्यप, वत्स नैध्रूव |
| 19. | ऐनवर | आईनवर, बुधनवर, डकनवर, कोयनवर, भकनवर, भाडनवर | गहलोल | सूर्यवंशी | कश्यप | काश्यप, वत्स नैध्रुव |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 20. | शिंगाडे | बुरंगळे, तरडे, व्हटकर, ढवणमाळ, श्रुंग ऋषीचा वंश | शेंगर | सूर्यवंशी | गौतम | अंगीरस . आयास्थ |
| 21. | बुटे | ताटे, कचरे, मोरे, कुवळकुंडे, बावदा, डोईफोडे, वाघ, पिसे, बिरे, दळवी, केस | प्रमार | अग्नीवंश | वशिष्ठ | वशिष्ठ, शक्ती, पराशर |
| 22. | लेंगरे | पिसुंदरे, किलीदरे, वगरे, जालीद, सिंगारे, श्रुंग ऋषीचा वंश. | सेंगर | सूर्यवंश | गौतम | अंगीरस आयास्थ गौतम |
| 23. | आवळे | पुकळे, यमगर, यमनवर | गहलोल | सूर्यवंश | कश्यप | काश्यप, वत्स नैध्रूव |
| 24. | ठोंबरे | सोनावळे, व्हटे, काटमारे | तंबर | यदुवंश | गर्गायन | गर्ग, अंगीरस, वैन्य, बार्हस्पत्य भारद्वाज |
| 25. | ठेगण | सणगणे, टुले, ढेंगले | गहलीले | सूर्यवंश | कश्यप | कश्यव, वत्स नैध्रूव |
| 26. | आलदवर | बलदवर, करनवर, कमांडे, डांगे | गहलीले | सूर्यवंश | कश्यप | कश्यप, वत्स नैध्रूव |
| 27. | टकले | एरंडे, तुपे, टिकले | गहलीले | सूर्यवंश | कश्यप | कश्यप, वत्स नैध्रूव |
| 28. | मारकट | भिवरकर, मुटकर | गहलीले | सूर्यवंश | कश्यप | कश्यप, वत्स नैध्व |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 29. | दगडे | पोले, संसलाटे | गहलीले | सूर्यवंश | कश्यप | कश्यप, वत्स नैध्व |
| 30. | मासाळ | मिसाळ, होगमासाळ, आमुकसिद व खाजणे, साळ भांडगे, वळसे, पलोरी | सोळंकी | अग्नीवंश | भारद्वाज | अंगीरस बार्हस्पत्य भारद्वाज |
| 31. | लोकरे | बेलनकर | गहलोल | सूर्यवंश | कश्यप | काश्यप |
| 32. | कुलाल | बिसे, बुचुटे | गहलोल | सुर्यवंश | कश्यप | वत्स, नैध्व |

## परिशिष्ट – क

## मु ला ख त

प्रश्न 1 – धनगरी समाजाचे पूर्वीचे व आजचे भटके जीवन यात काय फरक आहे ?

– धनगरीच समाजाच्या पूर्वीच्या व आजच्या जीवनात काहीच फरक नाही.

प्रश्न 2 – धनगर समाज शिक्षणापासून वंचीत का राहीला ?

– सततच्या भटकंतीमुळे धनगर समाज शिक्षणापासून वंचीत राहीला.

प्रश्न 3 – धनगर समाज सतत भटकत का राहीला ?

– मेंढपाळ व्यवसायामुळे धनगर समाज सतत भटकत राहीला.

प्रश्न 4– भटक्या समाजाने स्थिर जीवनाचा मार्ग शोधून का काढला नसेल ? याबद्दल आपले मत काय ?

– योग्य मार्गदर्शनाचा अभाव असल्यामुळे भटक्या समाजाला स्थिर जीवनाचा मार्ग शोधून काढता आला नाही.

प्रश्न 5– सध्याच्या शैक्षणिक वाटचालीत भटक्या जीवनावर काय परिणाम झाला ?

– शिक्षणामुळे भटक्या जमातीत स्थिरता आली.

प्रश्न 6 – भटक्या जमातीत अजुनही शिक्षणाचे प्रमाण का कमी आहे ?

– भटक्या जमातीतील लोकांना शिक्षणाचे महत्त्व अजुन हवे तेवढे समजले नाही.

प्रश्न 7 – भटक्या समाजातील स्त्रीया बद्दल तुम्हाला काय वाटते ?

– भटक्या समाजातील स्त्रीयामध्ये खुप मागासलेपणाची जाणीव आहे. या समाजातील स्त्रीया ह्या अज्ञानी आहेत. त्यांच्या अज्ञानीपणावर उपाय म्हणजे स्त्रीशिक्षण होय

प्रश्न 8 – धनगरी समाजाबद्दल आपले मत काय आहे ?

– धनगरी समाज हा इमान राखणारा समाज आहे. तसाच तो निरूपद्रवी समाज आहे.

फुकटच्या पैशाची तो अपेक्षा करत नाही. कष्ट करून मिळेल त्यावर तो समाधान मानतो.

प्रश्न 9 – धनगरी समाजाचे शेळीसारखे गरीब वागणे आहे काय ? शेळी–मेंढीच्या सहवासामुळे तो गरीब झाला आहे काय ?

– होय, होय.

प्रश्न 10– अहिल्याबाई होळकर, मल्हारराव होळकर यांचे मोठे योगदान असूनही हा समाज मागे का ?

– धनगर समाजात अहिल्याबाई होळकर व मल्हारराव होळकर यांच्या कर्तृत्वाचा अभ्यास करण्याची वृत्ती नाही.

प्रश्न 11= धनगर समाजासाठी महनीय लोकांनी काय केले ?

– धनगर समाजासाठी महनीय लोकांनी त्यामानाने काहीही केले नाही.

प्रश्न 12– पेशव्यांनी, छत्रपतींनी जातीजमातींच्या लोकांचा विचार केला होता काय ? त्यांना विचार करणे आवश्यक होते काय ?

– नाही, असा विचार करणे आवश्यक होते.

प्रश्न 13– इतिहासातील अनेक राजांनी पराक्रम गाजवला पण त्यांनी धनगर समाजासाठी काय केले?

– काहीच केले नाही.

प्रश्न 14– धनगरी लोकगीते अधिक उजाडयात येण्यासाठी कोणते उपाय करावे लागतील ?

– धनगरी लोकगीते अधिक उजाडयात येण्यासाठी प्रसिध्दीचा स्रोत असावा.

प्रश्न 15– राजकीय क्षितिजावर धनगर समाजातील तळपणारे तारे उदा.मा.आण्णा डांगे, शिवाजीराव शेंडगे यांचे धनगर समाजासाठी काय योगदान आहे ?

– धनगर समाजासाठी वरील लोकांनी केलेले प्रयत्न समाजाजगृतीचा अल्प प्रयत्न आहे.

प्रश्न 16– धनगर समाजाच्या नविन संघटना कोणत्या आहेत ? आपण सभासद आहात काय ?

– धनगर समाजाच्या संघटना पुढीलप्रमाणे आहेत.

1. महाराष्ट्र राज्य धनगर समाज उन्नती मंडळ.

2. धनगर महा संघ.

3. यशवंत सेना इ.

होय. जिल्हा उपाध्यक्ष.

प्रश्न 17– धनगरांच्या धार्मिक जीवनाबद्दल महाराष्ट्रातील धनगर संस्कृती व हिंदु संस्कृती या एकच नव्हेत काय ?

– होय. या दोन्ही संस्कृती एकच आहेत.

प्रश्न 18– अंधश्रध्दा निर्मुलन चळवळ धनगर समाजापर्यंत का पोहचली नाही ? उदा. अजुनही लहान वयात लग्न का होतात ?

– धनगर समाज हा सतत भटकंतीचे जीवन जगत असल्यामुळे अंधश्रध्दा निर्मुलन चळवळ या समाजापर्यंत पोहचत नाही. शिक्षणाचा अभाव असल्यामुळे धनगर समाजात लहान वयात लग्ने होतात.

प्रश्न 19– आज धनगर समाजात अंधश्रध्दा आहे काय ? कशा प्रकारची आहे ?

– होय. प्राण्यांना बळी देणे, शिक्षणाचा अभाव असल्यामुळे हा भोळाभाबडा समाज आहे.

प्रश्न 20– महिला मंडळे धनगर समाजाबाबत कार्यरत का नाहीत ?

– स्त्री शिक्षणाचा अभाव असल्यामुळे महिला मंडळे धनगर समाजाबाबत कार्यरत नाहीत.

प्रश्न 21– महाराष्ट्रातील हजारो महिला मंडळे ही या समाजातील अंधश्रध्दा नष्ट करणे, शिक्षण प्रसार करणे इ. कामे का करत नाहीत ?

– महाराष्ट्रातील हजारो महिला मंडळे ही वरकरणी कामे करतात.

प्रश्न 22– धनगर समाज अजुनही भटका का आहे ?

– मेंढपाळ व्यवसायामुळे धनगर समाज अजुनही भटका आहे.

प्रश्न 23– शासन नवीन उद्योग सुरू करते. उदा.कुक्कुटपालन, शेळया–मेंढया पालन इ. व्यवसाय उद्योगधंद धनगरांना का दिले नाहीत ? इतर समाजातील लोकांना का दिले जातात ? याबद्दल आपले मत काय ?

– धनगर समाजाला योग्य नेतृत्व नाही. त्यामुळे इतर समाजातील लोकांना हे व्यवसाय – उद्योग दिले जातात.

प्रश्न 24– धनगर समाजाचे वाड्.मयीन चळवळी संदर्भात कोणते प्रयत्न चालू आहेत ?

– कोणतेच नाहीत.

प्रश्न 25– वाड्.मयीनदृष्टया लोकसाहित्यामधील धनगरी लोकगीतांचे आगळेवेगळेपण काय वाटते?


– एकनिष्ठता व बिरदेवावर, खंडोबावर त्यांची दृढ श्रध्दा आहे.

(डॉ.शिवाजीराव दिनकरराव कुंडलकर)


उपाध्यक्ष, सातारा जिल्हा धनगर

समाजोन्नती मंडळ, महाराष्ट्र राज्य.

## परिशिष्ठ "ड" – छायाचित्रे




लोप्रंद परिसरातील माळ रानावर बकरी चारणारा धनगर




जात्यावर गाणी म्हणणाऱ्या न्निंबोडी गावच्या स्त्रीया




दावजी पाटलाच्या मंदीरासमोर बांधलेली पैशाची माळ – श्री क्षेत्र निंबोडी




सालपे गावातील बिरोबाचे मंदीर



सालपे गावातील बिरोबाच्या मंदीरासमोर असणारा मंडप




बिरोबा मंदीराचे शिखर




बिरोबा मंदीरावरील कला




धनगरांचे गजनृत्य



जेजूरी गड



जेजूरी गडावरील खंडोबाचे मंदीर




जेजूरी गडाच्या डोंगरावर असणारे कढे पठार



खंडोबाच्या छत्राखाली विसावलेली जेजूर नगरी



जेजूरी गडावरील वाघ्या व मुरूळी आणि त्यांच्यासमोर असणारे नुकतेच लग्न झालेले जोडपे



बिरोबा मंदीराच्या भिंतीवर काढलेली विविध चित्रे

# संदर्भ ग्रंथ सूची

## संदर्भ ग्रंथ सूची


1. Census of India - 1991, Series - 14, Part - 12, A and B, District Census Handbook - Satara By - J.K.Bhanthia, Director of Census Operations Maharashtra - 1996, Printed at the Government Central Press, Mumbai.
2. "सुंदर सातारा" लेखक – रमेश मंत्री, प्रथमावृत्ती, 26 जानेवारी 1986, अनुभव प्रकाशन – 1, मुंबई – 57
3. "ज्ञानगंगा" गौरव विशेषांक 1992, संपादक – श्री. सुरेश बुधकर खंडाळा विभाग शिक्षण समिती खंडाळा.
4. "राजा शिवछत्रपती", पूर्वार्ध व उत्तरार्ध, लेखक – बाबासाहेब पुरंदरे, पुरंदरे प्रकाशन, 1228 सदाशिव पेठ, पुणे – 30, बारावी आवृत्ती, 20 एप्रिल 1993.
5. "श्री मल्हारी मार्तंड" लेखक – म.स.घोलप, उमा पब्लीकेशन पुणे – 30, नविन आवृत्ती – 1997.
6. "श्री खंडोबाची नवी जुनी गाणी" संपादक – शिवदास जानबा कदम, उमा पब्लीकेशन, पुणे – 30, नविन आवृत्ती, 1997.
7. "श्री मल्हारी कथासार" लेखक – न.वि.बिडकर, सारथी प्रकाशन, पुणे – 30, सन 1997.
8. "श्री खंडोबाच्या गोष्टी", श्रीकांत गोवंडे, अनमोल प्रकाशन – 2, नविन आवृत्ती – जानेवारी 1997.
9. "चौथी लोक-साहित्य परिषद", सांगली, लोकसाहित्य आणि साहित्यप्रकार, लेखक – डॉ. मधु कुलकर्णी.

10. "लोकसाहित्याचे लेणे", सौ.मालतीबाई दांडेकर

11. "लोकसाहित्याची रूपरेखा", दुर्गा भागवत, प्रस्तावना.

12. "महाराष्ट्र जीवन" खंड दुसरा, लोकभाषा व लोकसाहित्य, लेखक – दुर्गा भागवत.

13. "लोकसाहित्याचे स्वरूप", लोकसाहित्य संज्ञा व अर्थ, प्रकरण – 1, लेखक – प्रभाकर मांडे.

14. "समाज आणि धर्म", ऋग्वेदकाळ ते पुराणकाळ, लेखक – जयंत गडकरी, ग्रंथाली अभिनय, वाचक चळवळ.

15. "महाराष्ट्रीय ज्ञानकोष", विभाग – 20, वऱ्हाड सचिन, संपादक – श्रीधर व्यंकटेश केतकर.

16. "लोकसाहित्याचे अंतप्रवाह", लेखक – डॉ.प्रभाकर मांडे, कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे – 30, पहिली आवृत्ती – 1975.

17. "लोकसाहित्य, एक स्वतंत्र अभ्यास क्षेत्र", दुसरी आवृत्ती –1993, प्रकाशक – दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, 830, सदाशिव पेठ, पुणे – 4.

18. "महाराष्ट्र राज्य धनगर समाज महासंघ", (स्मरणिका) पहिले अधिवेशन, चांदवड, जि.नाशिक, 18 ऑक्टोबर 1992, संपादक – आ.आण्णा डांगे, प्रकाशक, जी.डी.पाटील अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य धनगर समाज महासंघ.

19. "मराठी स्त्रीगीते", डॉ.शरद व्यवहारे, प्रथम आवृत्ती, 2 आक्टोबर 1991, प्रतिभा प्रकाशन

20. "श्री विठ्ठल–बिरदेव महात्मय", प्रकाशक – श्री वसंतराव दत्तात्रय जाधव, ब्लॉक क्रं.10, शिव अपार्टमेंट नागाळा पार्क, कोल्हापूर – 3.

21. "दासबोध" प्रकाशक – केशव गणेश सारंगपाणी, आर्यभीषण मुद्रणालय 915/1, शिवाजीनगर, पुणे – 4, 1960.

22. "श्री वाग्देव महाराज स्तवन", प्रकाशक – श्री वाग्देव महाराज देवस्थान ट्रस्ट, मु.वाठार स्टेशन, ता.कोरेगांव, जि.सातारा.

23. "लज्जागौरी", रा.चिं.ढेरे, श्री विद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 20 जून 1978, पुन मुद्रण – 26 जानेवारी 1988.

24. "महाराष्ट्रातील भटका समाज : संस्कृती व साहित्य", डॉ.नागनाथ धों. कदम, प्रतिभा प्रकाशन, पुणे – 30, प्रथमावृत्ती – 1995.